# मेट्रो स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात

## मेट्रो-३ मार्गावरील २६ स्थानकांची कामे युद्धपातळीवर

### अशी झाली कामे?

● सिद्धीविनायक ९३.३,दादर ८६.२, शितलादेवी ६५.६, धारावी ८७.१, बीकेसी ८३.७, विद्यानगरी ८६.६, सांताक्रूझ ८४.३, देशांतर्गत विमानतळ ८७.७, आंतरराष्ट्रीय ८८.३, सहार रोड ८८.१ , मरोळ नका ९२.१, एमआयडीसी ९४.७, सिप्झ ९४.५ कफ परेड ९३.४, विधन भवन ९२.४, चर्चगेट ९१.२, हुतात्मा चौक ८६.६, सीएसएमटी ८७.८, काळबादेवी ६१.१, गिरगाव ४७.४ ग्रांट रोड ७३.९, मुंबई सेन्ट्रल ८४, महालक्ष्मी ८२.५, सायन्स म्यूझियम ८३.८, ए.ए.चौक ८०.२ आणि वरळी ८२

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ मार्गाच्या स्थानकांच्या उभारणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. सिप्झ, एमआयडीसी, मरोळ नका, सिद्धीविनायक, कफ परेड, विधानभवन आणि चर्चगेट या स्थानकांची कामे ९० टक्क्यांपेक्षा जास्त पूर्ण झाली आहेत.

सिप्झ आणि एमआयडीसी स्थानकांची कामे तर ९५ टक्के पूर्ण झाली आहेत. स्थानकांच्या बांधकामासह सरकते जिने बसवणे, वीज, रेलिंग आदी कामेही सुरु आहेत. आतील कामेही वेगाने सुरु असून ही कामे जवळपास ५० टक्के पूर्ण झाली आहेत. स्थानकांच्या उभारणीत गिरगाव स्थानक काहीसे पिछाडीवर पडले आहे. या स्थानकाचे काम फक्त ४७ टक्के झाले आहे. २६ स्थानकांची कामे सध्या सुरु आहेत. दुसरीकडे आरे कॉलनीत कारडेपो उभारण्याच्या कामालाही गती देण्यात आली आहे.